
आला रे आला...
टारझन आला
दिनकर काकडे
परी प्रकाशन

आला रे आला... टारझन आला

© सुरक्षित

**प्रकाशक :**
**परी प्रकाशन**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती :**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत :**
रुपये १४०/-




## अनुक्रमणिका

१. टारझनचा जन्म .............. ३
२. साक्षात्कार .................... २१
३. काळ्या आईचं छत्र हरपलं .... ३७
४. करचकाचा वध .............. ५३
५. जेन आणि टारझन ............ ७१
६. टारझनशी गट्टी ............... ९१
७. डायरीतील गुपित ............. १११
८. पॅरिसमधील साहस ........... १३१
९. कैदी टारझन .................. १५२
१०. सोन्याच्या विटा .............. १७२




✦✦



# टारझनचा जन्म

फार फार वर्षांपूर्वीची गोष्ट. एक फार मोठ्ठे जंगल होते. जंगलात अनेक प्रकारची लहानमोठी झाडे होती. झाडांवर अनेक प्रकारच्या वेली अगदी शेंड्यापर्यंत सापासारख्या वेढा घालून वाढलेल्या होत्या. झाडी इतकी दाट होती की, सूर्याची किरणंही जमिनीवर येऊ शकत नव्हती. त्यामुळं अरण्य दाट अंधारमय असायचं. झाडावर वेगवेगळे पक्षी घरटी करून राहात होते. जंगलात अनेक ओढे, नाले, अन् नदी पण बारमाही वाहात होती. जंगलात वाघ, सिंह, कोल्हे, हत्ती, रानडुक्कर, रानरेडा, जिराफ असे विविध प्राणी कळपा–कळपाने राहात होते. झाडावर, वारुळात अनेक प्रकारचे विषारी साप व नागही होते. जंगलात अनेक प्रकारची वानरे–माकडे होती. त्यात 'एप' जातीची माकडेही होती.

ही 'एप' जातीची माकडे भल्या मोठ्या राक्षसाप्रमाणे अक्राळ–विक्राळ व अतिशय शक्तिमान होती. ही माकडे टोळी–टोळीने राहात होती.


अशीच एक टोळी जंगलात राहात होती. फिरत होती. या झाडावरून त्या झाडावर उड्या मारीत होती. या 'एप' माकडाच्या टोळीचा प्रमुख करचक नावाचा अतिशय बलाढ्य आणि अक्राळ–विक्राळ तसाच क्रूर वानर होता. या करचकाचा आपल्या टोळीवर जबरदस्त दरारा होता. जंगलातील इतर प्राणीही करचकास अतिशय घाबरून होते. कारणही तसेच होते. एकदा का करचक खवळला की, समोरच्या वानराचं किंवा इतर प्राण्यांचं काही खरे नव्हे. तो त्याला हाताने वर उचलून हवेत गरागरा फिरवून दूर फेकून द्यायचा. तसा त्या प्राण्याचा जीव जायचा किंवा आपल्या अणकुचीदार नखांनी ओरबाडून, आपल्या भल्यामोठ्या जबड्यात त्याचा मांसाचा गोळा करूनच खाई आणि त्या प्राण्याचा प्राण गेला तरच मग त्याचा जीव थंड होई.

आजही तसेच झाले. करचक खवळून आला होता. जे वानर त्याच्या तावडीत सापडेल त्याला ठार मारीतच तो सुटला. डोळे अंगारासारखे करून मोठ्याने तो चित्कारत होता. त्याच्या चित्काराने सारं जंगल थरारून जात होतं. अशात एक वृद्ध वानर त्याच्या समोर आलं. करचकाला खवळलेला पाहून ते दूर पळण्याचा प्रयत्न करू लागलं पण करचकाने त्याची मानगूट धरून गरगर फिरवून असा काही भिरकावला की तो पडल्या ठिकाणीच गतप्राण झाला.

करचकाचा असा गोंधळ चालू असताना तिथंच काही अंतरावर 'काळी' नावाची माकडीण झाडावर आपल्या पोटच्या मुलासाठी कुठं फळ दिसतंय का ते पाहात होती. पोटचं पिलू आपल्या आईच्या पोटाशी घट्ट बिलगून राहिलं होतं. बाकीचे वानर तिला सावध करण्यासाठी खुणावत होते पण 'काळी' चं फळ शोधण्याच्या नादात लक्ष गेलं नाही अन् अचानक ती करचकाच्या समोर आली.

करचक भयंकर संतापला. आपण असे खवळलेले असताना एक वानरीण चक्क आपल्यासमोर उद्धटपणे उभी राहते म्हणजे काय ?

त्याने काळीला मारण्याचा प्रयत्न केला पण काळीनं चलाखी करून त्याच्या तावडीतून निसटून उंच उडी मारली आणि उंच झाडाच्या शेंड्याची फांदी पकडली. पण उडी मारण्याच्या घाईत पोटचं पिल्लू केव्हा निसटलं ते कळलंच नाही आणि ते पिल्लू फांदीवरून घसरत जमिनीवर आदळलं आणि त्याचं डोकं फुटून गेलं, रक्ताच्या थारोळ्यात ते मरून गेलं.



पोटचं पिल्लू असं निसटून रक्ताच्या थारोळ्यात पडून मरून गेल्याचं काळीच्या नजरेला पडताच ती आक्रंदून चित्कारू लागली, रडू लागली. तिचं ते मृत पिल्लू पोटाशी धरून रडत राहिली.

करचकाचा राग शांत झाला. तो काळीकडे, काळीच्या मृत पिलाकडे हताश होऊन पाहू लागला. त्या काळीचा हंबरडा ऐकून त्याचं मन विव्हल झालं. पण आता त्याचा उपयोग काय ?

आपल्या पिल्लानं डोळे उघडावेत म्हणून काळी त्या पिल्लाला जागवण्याचा प्रयत्न करू लागली पण छे ! ते पिल्लू मृत झालं होतं !

बाकीचे वानर आपापल्या कामाला लागले आणि करचकानं सर्वांना एकत्र बोलावून घेतलं आणि मग सर्वांना समुद्रकिनारी जायचं आहे अशी आज्ञा सोडली.

राजाचा असा हुकूम सुटताच मग सर्व वानरे पळत, उड्या मारत समुद्राच्या दिशेनं पळत होती.

या वानराच्या कळपात काळीही आपल्या मेलेल्या पिल्लाला पोटाशी धरून जात होती. तिचा नवरा टबलट यानं, 'आता आपलं पिल्लू मेलं असून ते टाकून दे' असं सांगूनही काळीनं ऐकलं नाही. अखेर तिचं आईचं हृदय. आपल्या काळजाच्या तुकड्याला ती कसं टाकेल !

सगळी वानरसेना आपल्याच नादात, पळत-उड्या मारत, मध्येच झाडावरील फळे खात जात होती. सारे कसे आनंदित होते. जणू काही झालंच नाही !

पण... काळीच्या हृदयावर फार मोठा आघात झाला होता. पोटच्या पिलाच्या निधनानं ती शोकाकुल झाली होती. ती आपल्यातच हरवून गेली होती. तिला वाटत होतं, आपलं पिल्लू जिवंत होईल म्हणून ती परत परत त्या पिल्लाला आपल्या छातीशी कवटाळत होती. त्याच्या जखमांतून वाहणारं रक्त चाटत होती. तिच्या डोळ्यांतून वाहणारे अश्रू थांबता थांबत नव्हते.

सर्व वानरांची टोळी आता टेकडीवर एकत्र जमली. करचकही मध्यावर येऊन बसला. टेकडीपासून दूरवर एक टुमदार झोपडी होती. तिकडं त्याचं लक्ष गेलं. अर्थात गेल्या कित्येक दिवसांपासून त्याची त्या झोपडीवर नजर होती पण झोपडीजवळ जाण्याचं त्याचं धाडस होत नव्हतं. झोपडीकडं पाहिलं की त्याच्या पोटात धस्स व्हायचं. कारण त्या झोपडीत एक गोऱ्या कातडीचा प्राणी राहात होता आणि त्या गोऱ्याची त्याला भीतीच वाटे. कारणही तसं होतंच. त्या गोऱ्याजवळ लांब नळीसारखी काठी होती. त्या काठीच्या नळीतून कसलीतरी धडाड-धूम करून गोळी सुटायची आणि त्या गोळीनं समोरचा प्राणी मरून जायचा. अशा तऱ्हेनं त्या गोऱ्या प्राण्यानं करचकाच्या टोळीतील अनेक वानरं मारली होती. तशीच गोळी आपल्याला लागली तर....! म्हणून तो घाबरून राहायचा.

.... पण करचकाला सारखं वाटायचं की ती काळी काठी हातात धरून बघावी, तशीच गोळीपण सोडावी. त्याच्या झोपडीत काय आहे हे पाहावं. तो गोरा प्राणी जवळ जाऊन पाहावा कसा दिसतो तो. पण त्याची काही झोपडीजवळ जाण्याची हिंमत होत नव्हती.

✦

इंग्रजांना आफ्रिका खंडावर आपलं साम्राज्य पसरवायचं होतं पण इतरही जगातील देश तसा प्रयत्न करीत होते आणि अशा वार्ता इंग्लंड सरकारच्या कानावर येऊ लागल्या. मग हे देश कुठले ? याचा तपास करणं आवश्यक होतं.

पण तपास करणं अतिशय अवघड आणि कठीण होतं आणि तसा तपास करणारी अतिशय बुद्धिमान आणि बळकट व्यक्ती कोण मिळेल?

आफ्रिकेच्या जंगलातून इंग्लंडला अमाप संपत्ती मिळणार होती आणि तीही वेगवेगळ्या स्वरूपातून. वनस्पती, लाकूड, हस्तिदंत, विविध प्राण्यांच्या कातडी इ. अन् हे इतर देशांना मिळता कामा नये असं इंग्लंडला वाटत होतं.

... आणि म्हणून इंग्लंड सरकार अशा सक्षम व्यक्तीच्या शोधात होते आणि थोड्याच दिवसात त्यांना योग्य व्यक्ती मिळाली. त्या व्यक्तीचं नाव होतं, 'जॉन क्लेटन.'

जॉन क्लेटन हा उंच-गोरा, बळकट शरीरयष्टीचा आणि बुद्धिमान होता. त्याचा जन्मच मुळी राजघराण्यातला असल्यानं तो राजबिंडा-देखणा दिसत होता. त्याला नेहमी आव्हान म्हणून नवीन साहस करण्याची ऊर्मी येई.

... आणि इंग्लंड सरकारनं जॉन क्लेटनसारख्या व्यक्तीची निवड केली आणि तसं पत्रही त्याच्या स्वाधीन केलं. जॉन क्लेटनला निवडीचं पत्र मिळताच अतिशय आनंद झाला.

आफ्रिकेच्या कामगिरीवर आपली झालेली निवड केव्हा एकदा घरी जाऊन आपल्या प्रिय बायकोला सांगतो असं त्याला झालं. तो घरी आला अन् आपल्या बायकोला एलीसला म्हणाला, ''एलीस, मी आनंदाची बातमी आणलीय!'' त्यावर बायकोही आनंदून उद्गारली, ''कोणती बरं?''

''अगं, मला आफ्रिकेत जायची ऑफर मिळालीय!''

''म्हणजे ? मला सोडून एकटे कसे काय जाणार ?''

अन् क्लेटनच्या डोक्यात प्रकाश पडला.


'अर्रर ! आपण आपल्या बायकोचा-एलीसचा विचारच केला नाही. ती एकटी कशी – कुठं राहणार ? बरे तिला घेऊन जावे म्हटले तर तिला जंगलात कसं न्यायचं ?'

अशा तऱ्हेनं क्लेटन द्विधावस्थेत पडला. मग त्यानं सल्ला म्हणून नातेवाईकांना विचारलं तर ते म्हणाले, ''अहो, तिला एकटीला ठेवून जाण्यापेक्षा स्वत:बरोबर घेऊन जा. तिचीही सफर होईल!'' तर काही नातेवाईक म्हणाले, ''अहो, जंगल म्हणजे हिंस्र श्वापदं असतात, रानटी लोक असतात अन् मग बायकोला कसं नेणार?

मित्र व नातेवाईक यांच्या वेगवेगळ्या मतांमुळे जॉन क्लेटनचा तर गोंधळच उडून गेला आणि त्यानं मनाशी ठरवलं, काय व्हायचं ते होऊ दे पण बायकोला बरोबरच घेऊन जाऊया ?

अन् मग जॉन क्लेटनने बायकोसह– एलीससह जायची पूर्ण तयारी केली आणि आफ्रिकेला जायला निघाले.

इंग्लंडच्या डोव्हर बंदरातून एक जहाज बाहेर पडले. त्याच जहाजात जॉन क्लेंटन आणि एलीस बसले होते. जहाज समुद्रातून महिनाभर प्रवास करून फ्री टाऊन बंदराला लागले आणि आता जॉन क्लेटनला आणि एलीसला जहाज बदलावे लागणार होते. पण फार वेळ वाट पाहावी लागली नाही. दुसऱ्याच दिवशी जहाज लागले. ते 'फुवाल्डा' जहाजात बसून पुढचा प्रवास करू लागले.



जहाजातील सुरुवातीचे दोन दिवस सुखाचे गेले पण जहाजावरील एकंदरीत वातावरण गढूळ वाटत होते. फुवाल्डा बोटीतील खलाश्यांचं वागणं काहीसं तिरसटच वाटत होतं.

'फुवाल्डा' जहाजावरील कप्तान उद्दाम, उर्मट, हेकेखोर स्वभावाचा होता. तो दिसायला उंच-धिप्पाड आणि डोळे व चेहरा क्रूर वाटत होता. अर्थात त्याच्या हाताखालचे खलाशी व इतर नोकरवर्गही तसेच उद्धट व उर्मट होते. ते सर्वजण वेगवेगळ्या देशांतील गुंडच होते आणि तुरुंगाच्या भीतीनं ते जहाजावर आले होते. कप्तान हा स्वत: गुंड व गुन्हेगारच असल्यानं आपल्या पदाचा योग्य वापर करून सर्वांवर त्याची छाप पाडत होता. दरारा वाढवत होता.

तिसरा दिवस उजाडला. बोटीच्या डेकवर कप्तान एलीसशी गप्पा मारण्यात गुंग होता पण जॉन क्लेटनचं त्याच्यावर पूर्ण लक्ष होतं. शेजारीच दोन खलाशी डेक साफ करीत होते. त्यांचं कप्तानाकडं लक्ष नव्हतं. कप्तान एलीस व क्लेटनचा निरोप घेऊन झट्कन जाण्यासाठी वळला अन् त्यातल्या म्हाताऱ्या खलाश्याशी नकळत पण जोरात टक्कर झाली. कप्तान बेसावध असल्यानं त्याचा तोल जाऊन समुद्रात पडू लागला. मग स्वत:ला सावरण्यासाठी त्यानं सांडपाण्यानं भरलेली बादली हाताशी धरली पण बादली कलंडली आणि कप्तानाच्या तोंडावर पडली आणि त्यातील घाण पाण्यानं त्याचं तोंड-अंग भिजून गेलं.

या प्रकारानं मात्र कप्तानाला अपमान झाल्यासारखं वाटल्यानं त्यानं त्या म्हाताऱ्या खलाश्याची मानगूट पकडून दोन ठोसे मारले आणि बिचारा म्हातारा कोलमडत खाली पडला. त्याला जोरदार मार बसल्यानं विव्हळू लागला. पण कप्तानाचा राग शांत झाला नव्हता. त्यानं परत पुढं जाऊन म्हाताऱ्याच्या पोटावर दोन लाथा हिसडून मारल्या तसा म्हातारा परत प्राणांतिक वेदनांनी ओरडू लागला. कप्तानाचा हा मुजोरीपणा पाहून दुसऱ्या तरुण खलाशाला संताप अनावर झाला आणि तो धावून कप्तानाच्या अंगावर आला आणि दोन जोरदार ठोसे त्याच्या नाकातोंडावर मारले. तसा कप्तान तिरिमिरीत लांब जाऊन पडला आणि त्याचा घुणाही फुटून नाकातोंडातून रक्त येऊ लागलं. खलाश्याच्या अचानक चढाईनं कप्तान सावध झाला. तो तशातच खिशातून पिस्तूल काढीत उठला आणि त्या खलाश्यावर पिस्तूल रोखले. आता तो खलाश्याच्या छातीवर पिस्तुलाचे ट्रिगर दाबणार तितक्यात जॉन क्लेटननं पुढं सरकून कप्तानाच्या हातावर लाथ मारली, पण कप्तानच्या हातातून पिस्तूल खाली पडले नाही. मात्र नेम चुकून छातीवर गोळी लागायची ती त्याच्या पोटरीवर बसली. खलाशी जबरी गोळीच्या मारानं विव्हळत खाली पडला. तसा कप्तानानं पडलेल्या खलाश्याच्या छाताडावर पाय ठेवून, त्याच्यावर परत पिस्तूल रोखले. हे पाहून जॉन

क्लेटन संतापून म्हणाला, '' मि. कप्तान, मी या जहाजावर जोवर आहे तोवर इथं कोणताही अनुचित प्रकार होता कामा नये. समजलं ?''

कप्तानाला दात-ओठ आवळतच का होईना पण गप्प बसावं लागलं कारण जॉन क्लेटनला दुखावून त्याला स्वत:वर संपूर्ण नाविक दलाचा रोष पत्करायचा नव्हता.

कप्तान शांत झाला पण त्याच्या मनात जॉन क्लेटनविषयी राग कायम राहिला अन् त्यानं मग क्लेटनशी व त्याची बायको एलीसशी बोलण्याचं, गप्पा मारण्याचं टाळलं.

बोटीवर मात्र वातावरण सतत अशांत होत होतं. खलाश्यात परस्परांत वारंवार तंटे-बखेडे एकमेकांचा जीव घेण्यापर्यंत मजल गेली होती.

हे सर्व पाहून जॉन क्लेटनला आपण या जहाजात प्रवेश करून फार मोठी चूक केली असं वाटू लागलं. डेकवरून दूरवरून एका जहाजाचा ठिपका दिसला तसं जॉन क्लेटनच्या मनात आलं की, आपण त्या जहाजात बसावं पण, ते जहाज सोडून आमच्या जहाजावर येण्याचं काय कारण ? असं विचारलं तर काय सांगायचं ? या जहाजाची भीती वाटते म्हणून ? नाही.... आता येईल त्या प्रसंगाला तोंड तर दिलंच पाहिजे. जॉन क्लेटनला स्वत:पेक्षा आपल्या बायको एलीसचीच काळजी वाटत होती.

तो म्हातारा खलाशी जॉनच्या जवळ आला आणि कानाशी बोलू लागला,

''साहेब, तुम्ही सावध राहा !''

''म्हणजे ?''

''या जहाजावर दंगलीचा स्फोट होणाराय !''

''ते केव्हा ?''

''ते मी सांगू शकत नाही !''


''पण नेमकं काय घडणार आहे ते तरी सांगशील का ?''

''आम्ही सगळे खलाशी कप्तानावर बंड करणाराय ! अन् हो, हे तुमच्याजवळच ठेवा. कुणाला 'ब्र' शब्द सांगू नका. नाहीतर तुम्हा दोघांचा जीव धोक्यात येईल, तुमचा काही संबंध नसताना तुम्हाला उगीच त्रास होईल म्हणून तुम्हाला सांगायला आलोय !'' परत इकडं-तिकडं चोरनजरेनं पाहात म्हणाला,

''साहेब, मग जपून राहा, मी चलतो. माझ्यावर कुणाची तरी नजर आहे !'' असं म्हणून तो निघून गेला.

जॉन क्लेटन विचारात पडला. त्यानं मग आपल्या बायकोशी एलीसशी संवाद साधला,

''एलीस, आपण या जहाजात येऊन फार मोठी चूक केलीय यातील खलाशी सर्व चोर-लुटारू-गुंड-गुन्हेगार असून सर्व खलाशी कप्तानावर बंड करून उठणार आहेत !'' यावर एलीस काही वेळ विचारात पडली अन् ती म्हणाली,



‘‘जॉन, आपण असं करूया ? ’’

‘‘काय ?’’ जॉननं प्रश्नार्थक मुद्रेनं विचारले.

‘‘बंडाची गोष्ट कप्तानाच्या कानावर घालूया ?’’

‘‘अगं, पण खलाशांना जर ही गोष्ट कळली तर ते आपल्याला ठेवतील का ?’’

‘‘जॉन, तेही बरोबर आहे, पण आपण नाही सांगितलं तर आपणही बंडात सामील आहोत असं कप्तानाला नाही का वाटणार? आणि मग त्याला आपल्याविषयी जो थोडाफार आदर आहे तोही जाईल !’’

‘‘एलीस, हे सगळं खरंय, मी एकटा असतो तर कसंतरी निभावून नेलं असतं पण तुझीच मला फार काळजी वाटतेय. त्या मूर्खानं आपल्या हाताखालच्या सर्वांना अपमानास्पद वागवून स्वत:वर रोष ओढवून घेतला आहे. आता त्या सर्व खलाशांनी कप्तानावर हल्ला करून त्याला ठार केल्यानंतर हेच खलाशी आपल्याबरोबर कसे वागतील याचीच मला काळजी आहे.’’

‘‘जॉन, तुझी भीती बरोबर आहे, पण कर्तव्य आणि स्वार्थ या दोन वेगवेगळ्या गोष्टी असून, आपण कर्तव्याला प्रथम प्राधान्य देणे महत्वाचे आहे. कर्तव्याच्या आड स्वार्थ येता कामा नये आणि तसं झालं तर ती गोष्ट जन्मभर काळजात सलत राहील.’’ यावर जॉन मनात काळजी ठेवून पण वरून मंद स्मित करीत म्हणाला,

‘‘एलीस, ठीक आहे. तुझ्या विचाराप्रमाणंच होईल. नाहीतर काय आता इकडं आड नि तिकडं विहीर आहेच !’’ असं म्हणून जॉन क्लेटननं कप्तानाच्या केबिनपाशी जाऊन दारावर टकटक केली. तसा आतून आवाज आला.

‘‘कोण आहे ?’’

‘‘मी जॉन क्लेटन !’’

‘‘याऽऽ दार उघडंच आहे !’’

जॉन क्लेटनला पाहून कप्तानाच्या कपाळावर आठ्या पडल्या. तो खाली पाहूनच म्हणाला,

‘‘बोला, काय काम आहे ?’’

‘‘तुम्हाला धोक्याची पूर्वसूचना द्यायला आलोय !’’

‘‘म्हणजे ?’’

‘‘तुमचे खलाशी तुमच्याविरुद्ध बंड करणार आहेत !’’

‘‘हेऽऽ तुम्हाला कुणी सांगितलं ?’’ कप्तान कुचेष्टेनं व संतापानं बोलला.

''तसं मला कळालं !''

''कळालं की.. आपणच बंड करणाराय ?''

''कप्तानसाहेब, असं असतं तर तुम्हाला जागं करायला आलो नसतो. अन् तुमच्यावर मी बंड करायला मी काही तुमचा दुश्मन नाहीय!''

''जॉनसाहेब, ते काही असो पण हे बंड-बिंड होणं अशक्य आहे, समजलं ! मी या जहाजावरचा कप्तान असून माझ्याशी बंड करणारा अजून जन्माला यायचा आहे. अन् मला येऊन सांगितलं ते सांगितलं पुन्हा दुसरीकडे सांगत सुटू नका. नाहीतर त्याचे दुष्परिणाम आपल्याला भोगावे लागतील. जाऽऽ चालू लागा !'' बोलता बोलता कप्तान रागाने परत किंचाळला ''जॉन ऽऽ जा म्हणतोय ना?''

जॉन क्लेटन अपमान शांतपणे गिळीत बाहेर जाण्यास वळला पण परत मान वळवून कप्तानाला म्हणाला, ''कप्तानसाहेब, मी एक सरळमार्गी जबाबदार अधिकारी असून तुम्हाला सावध करण्यासाठी आलो होतो पण तुम्ही मात्र स्वत:च्याच धुंदीत आहात. अन् ही धुंदी जेव्हा खाडकन उतरेल तेव्हा माझ्या बोलण्याची आठवण होईल पण त्यावेळी वेळ गेलेली असेल आणि त्यावेळी आपण स्वत: किती महामूर्ख होतो याचीही कल्पना येईल. चलतो. तुझ्यासारख्या मूर्खाच्या सहवासात राहायला कुणाला हौस आहे ?'' असं म्हणून जॉन क्लेटनही रागानं केबिनमधून बाहेर पडले.

जॉन आपल्या एलीसकडे आला. जॉन क्लेटनला पाहताच एलीस विचारती झाली,

''जॉन, कप्तानला सांगितलं ? मग तो काय म्हणाला ?''

''अगं, कसलं काय नि कसलं काय, त्याच्यासारखा महामूर्ख माणूस जगात शोधून सापडायचा नाही. मी त्याला शांतपणे सावध करण्यासाठी गेलोय तर मर्कटासारखा मलाच दम द्यायला लागलाय, माझ्यावरच आरोप करायला लागलाय, अन् समोरच्या माणसाशी कसं बोलावं याचाही त्याला सेन्स नाही. अगदी मग्रुरीपणाची, उर्मट-उद्दामपणाची हद्द झालीय !''

''जॉन, शांत व्हाऽऽ आपण कर्तव्य तर केलं.''

''अगं हो, पण आता आपण काय करायचं ?''

''जॉन, आपण आपल्या केबिनमध्ये तटस्थ राहू, कुणाचीच बाजू घ्यायला नको, अन् आता आपल्या हातात तरी काय आहे ? जे जे होईल ते पाहात राहायचं?

दोघंही मग चिंतातूर होऊन बसली अन् अचानक दाराच्या फटीतून एक चिठ्ठी आली. जॉननं उठून ती चिठ्ठी हातात घेऊन उलगडली अन् वाचली,

''सावध राहा, म्हाताऱ्या खलाश्याने सांगितलेली वार्ता कुणाला सांगू नका नाहीतर तुम्हाला समुद्रात फेकून देऊ, तुम्ही लपवून ठेवलेली पिस्तुले आम्ही चोरली आहेत. तेव्हा स्वस्थ बसा. अजिबात गडबड करायची नाही.''